
# विवेक विचार मंच – महाराष्ट्र

Reg.No.MAH/F-19710 / मुख्य कार्यलय - 557,विरेन्द्र हाइट्स, सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड, पुणे-30 / vivekvicharmanch18@gmail.com

## राज्यस्तरीय सामाजिक न्याय परिषद अहवाल – २०२३




राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती व सामाजिक न्याय दिनानिमित्त महाराष्ट्रात सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेली संस्था विवेक विचार मंच आणि शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय 'राज्यस्तरीय सामाजिक न्याय परिषद' २५ जून २०२३ रोजी संपन्न झाली. सामाजिक न्याय परिषदेचे उद्घाटन केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्य मंत्री श्रीमती डॉ.भारती पवार व राज्याचे कामगार मंत्री सुरेश खाडे यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे (बार्टी – BARTI) महासंचालक सुनील वारे, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू जी टी शिर्के, प्र- कुलगुरू प्रा. डॉ.पी एस पाटील, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.व्ही.एन.शिंदे व विवेक विचार मंच चे अध्यक्ष प्रदीप रावत, मंचाचे कार्यवाह महेश पोहनेरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

विवेक विचार मंच ही संस्था महराष्ट्रात सामाजिक विषयात कार्यरत असून भारतीय संविधान तसेच विविध वैचारिक विषयात प्रबोधन आणि सामाजिक न्यायाच्या विषयात काम करते. गेले तीन वर्षे राज्यस्तरावर सामाजिक न्याय परिषदेचे आयोजन केले जाते. **भारतीय संविधानाला अपेक्षित सामजिक न्याय, समताधिष्ठित, बंधुभावपूर्ण समाज निर्मिती च्या उद्देशाने सामाजिक न्याय परिषदेचे आयोजन केले जाते.** यावर्षी सामाजिक न्याय परिषदेत महाराष्ट्रातील २८ जिल्ह्यांमधून ६० पेक्षा अधिक संस्था संघटनांचे प्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्त्यांनी या परिषदेत सक्रीय सहभाग नोंदवला.

सामाजिक न्यायाच्या, समतेच्या विषयात कार्य करणाऱ्या संस्था किंवा सामाजिक कार्यकर्त्यांच्या कार्याचा गौरव व्हावा आणि त्यांच्या सामाजिक कार्याला प्रोत्साहन मिळावे या हेतूने विवेक विचार मंच द्वारे प्रतिवर्षी

**'राजर्षी शाहू महराज सामाजिक न्याय पुरस्कार २०२३'** हा राज्यातील चार संस्था संघटना किंवा सामाजिक कार्यकर्त्यांना प्रदान करण्यात येतो. प्रतिवर्षी हा पुरस्कार राज्यस्तरीय सामाजिक न्याय परिषदेत प्रदान करण्यात येतो. यावर्षी च्या परिषदेत केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्य मंत्री श्रीमती डॉ.भारती पवार व राज्याचे कामगार मंत्री सुरेश खाडे यांच्या शुभहस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत चार सामाजिक कार्यकर्त्यांना हा पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

प्रतिमा पूजन व संविधान वाचनाने सामाजिक न्याय परिषदेची सुरवात झाली. श्री अरुण कराड यांनी संविधान सरनामा वाचन केले. लोकशाही जागर मंच च्या कलाकारांनी जलसा सदर केला. विवेक विचार मंच चे अध्यक्ष प्रदीप रावत यांनी प्रास्ताविक केले व विवेक विचार मंच ची भूमिका थोडक्यात व्यक्त केली.




**विवेक विचार मंच चे अध्यक्ष श्री प्रदीप रावत यांचे मनोगत –**

भारतीय समाज सुधारकांनी जे प्रबोधन केले त्या प्रबोधन युगाचे अपत्य म्हणजे भारतीय संविधान आहे.



समाजात जो लक्षणीय बदल झाला आहे. तो प्रबोधन युगामुळे झाला आहे, चालीरिती, परंपरा यात जे काही चुकीचं आहे, ते बदलण्यासाठी प्रबोधन काळातील संस्था आणि प्रबोधनकारांमुळे समाज मोठ्या प्रमाणात बदलला. फ्रेंच राज्यक्रांती समता, स्वातंत्र्य, बंधुता या तत्त्वासाठी झाली, पण त्याचे हत्यार हिंसा हे होते, त्यातून नेपोलियन जन्माला आला, ज्याने संपूर्ण युरोपचे हालहाल केले. साम्यवाद ही दुसरी हिंसक क्रांती आहे. मार्क्स आदर्श तत्त्वज्ञान जरी चांगले वाटत असले, तरी साम्यवादी विचारधारेने नंतर हिंसा मार्गाने हुकूमशाही प्रस्थापित केली. आणि त्याला कामगारांची हुकूमशाही असं गोंडस नाव दिले. हुकूमशाही कुणाचीच नसते. या साम्यवादी राज्यक्रांतीमध्ये लाखो लोकांचे बळी गेले. भारतात लोकशाही सकारात्मकपणे चालू आहे, तरी काही लोक असे वातावरण निर्मिती करू पाहत आहेत, की ही लोकशाही, हे संविधान आम्हाला न्याय देऊ शकत नाही. आणि हे

उलथवुन टाकले पाहिजे, हे शब्द ते लोक बाबासाहेबांच्या तोंडी घालत आहेत, हे चिंताजनक आहे. सामाजिक अन्याय दूर करण्यासाठी संविधानिक व्यवस्था निर्माण केल्या पाहिजेत, वंचित घटकाची सामाजिक, राजकीय, आर्थिक भागीदारी वाढली पाहिजे. स्वातंत्र्याचा बळी घेऊन आम्हाला समता नको आहे, अशी बाबासाहेबांची भूमिका होती. समाज सुधारक प्रबोधनकारांना जातीजातीमध्ये वाटून घेत आहेत, हे चुकीचं आहे. आपल्या समाजाची गावकी एक आहे, पण भावकी एक नाही. आपल्याला भावकी एक करायची आहे, हीच विवेक विचार मंचाची भुमिका आहे. कोल्हापूर ही सामाजिक प्रयोगशाळा आहे, त्याचबरोबर महात्मा फुले आणि महर्षी कर्वे यांनी पुणे आणि सावरकरांनी रत्नागिरी येथे अशाच प्रयोगशाळा उभारल्या, प्रबोधनकार समाजापर्यंत पोहोचले पाहिजेत, ही आपली जबाबदारी आहे. संविधानिक मुल्ये रुजविण्याचे कार्य विवेक विचार मंच करत असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. सर्व महापुरुषांनी शहरांचे स्वागत केलं आहे, औद्योगीकरणाचे स्वागत केले आहे, औद्योगिकीकरणामुळे जातीच्या बेड्या गळून पडल्या. नवीन प्रकारची व्यवसाय, कौशल्य, तंत्रज्ञान यामुळे समाज ढवळून निघतो. या सगळ्या प्रबोधन चळवळीमुळे स्त्रियांची स्थिती खूप बदलली आहे. सती प्रथा, पडदा प्रथा अशा अनिष्ट रूढीमधून ती मुक्त झाली आहे. हा सकारात्मक बदल समाजापर्यंत पोहोचवण्यात आपण कमी पडतोय, तो समाजामध्ये पोहोचवणे, सामाजिक न्याय परिषदेचे उद्दिष्ट आहे. सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रत्येक गोष्ट विज्ञानाच्या कसोटीवर तपासून बघितली पाहिजे. एक जातीय हिंदू समाज निर्माण करणे बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न होते. कोणत्या जातीत जन्माला यायचं हे महापुरुषांच्या हातात नव्हतं, पण त्यांनी कोणत्या एका समाजासाठी काम केले नाही तर समाज एक करण्यासाठी काम केले. भावकी एकत्र करण्याच्या या प्रयत्नासाठी पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी काळजी घेतली पाहिजे.

(विवेक विचार मंच चे अध्यक्ष श्री प्रदीपदादा रावत यांचे पूर्ण भाषण ऐकण्यासाठी पुढील लिंक पहा. - https://www.youtube.com/watch?v=RNVi0IX2RzE&t=146s )

**केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांच्या भाषांतील प्रमुख मुद्दे -**

केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांनी परिषदेला संबोधित करताना म्हटले, 'वसुधैव कुटुंबकम'



या तत्त्वाप्रमाणे भारताने अनेक देशांना सहकार्य करत विकास जगाला दाखवून दिला आहे. अमृतमहोत्सवी वर्षात पुढील २५ वर्षे महत्त्वाची आहेत. शतक महोत्सवाचा आराखडा पुढे जाण्यासाठी प्रत्येकाने त्या जाणिवेतून काम करावे. देशाच्या प्रगतीसाठी प्रत्येकाने शाहू- फुले-आंबेडकर यांचे सामाजिक न्यायाचे विचार अंगीकारायला हवेत, मंत्री डॉ. पवार म्हणाल्या, "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने भारताने कोरोना काळात इतर देशांना औषधे, लसींचा पुरवठा व अन्य संकटकालीन मदत केली आहे. सामाजिक न्यायाने देशाला पुढे नेण्याचे संविधानाने शिकवले आहे. संविधानाचा सन्मान करणे, प्रत्येकाचे कर्तव्य असून देशाचा विकास साधताना स्त्री शक्तीचा सन्मान होणे महत्त्वाचे आहे. देशाचा सामाजिक पाया मजबूत

असेल तरच प्रगतीचा कळस चढू शकतो. सामाजिक स्वास्थ्यासाठी समानता, न्याय भावना या गोष्टी आवश्यक आहेत. देशात कौशल्याधिष्ठित युवा पिढी तयार होत असून, त्यांना जगभरातून संधी उपलब्ध होत आहेत. स्वातंत्र्याचा शताब्दी महोत्सव साजरा करण्यास आपल्याला अजून २५ वर्षे आहेत. तितक्या वर्षांचा रोडमॅप बनवून शिव-शाहू-फुले-आंबेडकर यांच्या विचारांची दिशा घेऊन आणि सामाजिक न्यायाचे तत्त्व अंगीकारून पुढे जाऊया. देशाची प्रगती करूया"

(केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार चे पूर्ण भाषण ऐकण्यासाठी पुढील लिंक पहा - https://www.youtube.com/watch?v=rePgdYYAHVY&t=182s )

**उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ध्वनीचित्रफितिच्या माध्यमातून या न्याय परिषदेला शुभेच्छा संदेश दिला.**



उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक समतेचा संदेश देत समाजाला योग्य दिशा व सामाजिक भान दिले. सामाजिक समतेचा संदेश व त्यासाठी कार्य करून लोकशाहीची मुहूर्तमेढ छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापुरात रोवली. याच विचारांनी लोकशाही मार्गाने वाटचाल करत भारत देशाने सर्व क्षेत्रात प्रगती साधली आहे. विवेक विचार मंचचे कार्य महत्त्वपूर्ण असून, समृद्ध समाज घडवण्यात ही परिषद महत्त्वपूर्ण ठरेल.

उपमुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांचे पूर्ण भाषण ऐकण्यासाठी पुढील लिंक पहा - https://www.youtube.com/watch?v=57Hff1NERl4 )

**कामगारमंत्री सुरेश खाडे यांनी सामाजिक न्याय परिषदेला संबोधित केले -**



कामगारमंत्री सुरेश खाडे न्याय परिषदेला संबोधित करताना म्हणाले, बहुजन समाजाच्या उन्नतीमध्ये महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. महापुरुषांनी दिलेला सामाजिक न्यायाचा विचार व त्यांच्या कार्याचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून प्रत्येकाने वाटचाल करायला हवी. पूर्वी दलित समाज हा ओढ्याच्या पलीकडे होता. गाव- कुसाच्या पलीकडे होता, तो गावाच्या प्रक्रियेत येऊ शकत नव्हता. ज्या मंदिरात मला नारळ फोडण्याचा अधिकार नव्हता. आज त्या मंदिराचे उद्घाटन मी करतो. आता

परिस्थिती बदलली आहे, तो काळ विरळ झाला आहे, पण संपलेला नाही. त्यामुळे आपण सक्षम असलं पाहिजे. पूर्वी पोलीस पाटील एका समाजातील असायचा पण आता शासनाने सामाजिक न्यायचं धोरण अवलंबल्यामुळे सर्व समाजातील पोलीस पाटील होऊ शकतात. अगदी आता पूजा करायला सुद्धा ब्राह्मणाची गरज नाही, आज दलित समाजातील पुजारी होऊन ते पूजा घालत आहेत. आता बऱ्याच अडचणी कमी झाल्या आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कधी हातात तलवार घेतली नाही, तर हातात लेखणी घेऊन सगळा बदल घडवून आणला. पेनाच्या जोरावर दलित, वंचित समाजाला न्याय मिळवून दिला. समस्या सगळ्यांना असतात, दोष सगळ्या व्यवस्थेत असतात, अशा प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वांतत्र्यवीर सावरकर आणि स्वामी विवेकानंदांची चरित्र वाचली तर आपल्याला प्रेरणा मिळते, संकंटातुन मार्ग मिळतो. मी एक कामगाराचा कामगारमंत्री आणि सांगली जिल्ह्याचा पालकमंत्री झालो, हे सगळं संविधानातील सामाजिक न्यायामुळे शक्य झालं.

( कामगारमंत्री श्री सुरेश खाडे यांचे पूर्ण भाषण ऐकण्यासाठी पुढील लिंक पहा - https://www.youtube.com/watch?v=_a8MHvHmstQ )

**श्री सुनील वारे यांचे मनोगत –**



डॉ बाबसाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (BARTI – बार्टी चे महासंचालक श्री सुनील वारे त्यांच्या मनोगतामध्ये म्हणाले, अनुसूचित जातीतील प्रत्येकाला प्रशिक्षण देऊन हाताला काम मिळवून देण्याचे काम 'बार्टी'च्या माध्यमातून करण्यात येत असून याचा लाभ घ्यावा. संविधानाच्या उद्देशिकेत सगळ्यात महत्त्वाचा शब्द म्हणजे सामाजिक न्याय आहे, जिथे जिथे विषमता असते तिथे तिथे सामाजिक न्याय महत्त्वाचा असतो. सामाजिक न्यायासाठी काम करणाऱ्या आपल्यासारख्याच काम खूप महत्त्वाच आहे. आरक्षणाच्या जनकाच्या भूमीतून सामाजिक न्यायाचे प्रयत्न प्रयत्न जात आहेत, अतिशय महत्त्वपूर्ण आहे. तुम्ही सगळे समाजात स्वयंप्रेरणेने सामाजिक न्याय पोहोचवण्याच काम करत आहात.ही अतिशय महत्वाच आहे. बार्टीच्या माध्यमातून उच्च शिक्षणासाठी फेलोशिप दिली जाते, तो सुद्धा सामाजिक न्याय देण्याचा प्रयत्न आहे. भारत, भारतीय, भारतीय संस्कृती एका महत्त्वाच्या कालखंडातून पुढे जात आहेत, भारतीय विचार हा वैश्विकीकरणाच्या प्रक्रियेत आहे.

(श्री सुनील वारे यांचे पूर्ण भाषण ऐकण्यासाठी पुढील लिंक पहा -https://youtu.be/pCK5PXsJGkQ )



शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, जाती-धर्मांतील भेद नष्ट करून समाजात समता प्रस्थापित करण्यासाठी फुले, शाहू, आंबेडकर यांच्यासारख्या महापुरुषांचे विचार जोपासणे गरजेचे आहे. समाजातून भेदभाव नष्ट करून सर्वांना न्याय देणे म्हणजे सामाजिक न्याय आहे. सामाजिक न्यायाच्यादृष्टीने राजर्षी शाहूंनी कार्य केले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने शाहू महाराजांचे जीवनचरित्र दोन परकीय भाषांबरोबरच विविध राज्यांच्या भाषेमध्येही भाषांतर करून शाहू महाराजांचे कार्य देश-विदेशात पोहोचवण्याचे प्रयत्न केले.

**'छत्रपती राजर्षी शाहू महराज सामाजिक न्याय पुरस्कार २०२३ – पुरस्कार प्रदान सोहळा -**

विदर्भातून चिखली जि.बुलढाणा येथील श्री. दौलतराव खरात यांना 'राजर्षी शाहू महराज सामाजिक न्याय पुरस्कार २०२३' प्रदान करण्यात आला. चिखली मध्ये त्यांनी नागसेन सांस्कृतिक व क्रीडा समिती व नागसेन बुद्ध विहार ची स्थापना केली व त्या माध्यमातून विविध उपक्रमांच्या अंतर्गत मोठे सामाजिक कार्य उभे केले. त्यांच्या सामाजिक कार्याची माहिती देणारा व्हिडीओ पुढील लिंक अथवा क्युआर कोड द्वारे पहावा.

लिंक - https://youtu.be/UkdYb0y_mOE



मराठवाड्यातून आष्टी, जि.बीड येथील श्री. वाल्मिक निकाळजे यांना 'राजर्षी शाहू महराज सामाजिक न्याय पुरस्कार २०२३' प्रदान करण्यात आला. चार दशके सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेले वाल्मिक तात्या जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते आहेत. समता अधिकार आंदोलन, भारतीय दलित पँथर, दलित शोषित संघर्ष समिती, मानवी हक्क अभियान, बाल हक्क अभियान, जमीन विकास आंदोलन, लोकधारा नेटवर्क अशा अनेक संस्था संघटनांच्या माध्यमातून त्यांनी वंचित समाजाच्या अन्याय, अत्याचाराच्या विरोधात न्याय हक्कांसाठी कार्य केले व आजही कार्यरत आहेत. त्यांच्या कार्याची माहिती देणारा व्हिडीओ पुढील लिंक अथवा क्युआर कोड द्वारे पहावा.




लिंक - https://youtu.be/Pzdx0ELW8N0




पश्चिम महाराष्ट्रातून नाशिक येथील श्री.योगेश शिंदे यांना 'राजर्षी शाहू महराज सामाजिक न्याय पुरस्कार २०२३' प्रदान करण्यात आला. नाशिक शहरात 'अनामिक' या संस्थेच्या द्वारे वंचित घटकांतील वस्त्यांमध्ये तरुणांना संघटीत करून शैक्षणिक उपक्रम, संविधान विविध विषयांत प्रबोधन, संस्कार केंद्र अशा उपक्रमांच्या द्वारे सामाजिक कार्य करत आहेत. त्यांच्या सामाजिक कार्याची माहिती देणारा व्हिडीओ पुढील लिंक अथवा क्युआर कोड द्वारे पहावा.

लिंक - https://youtu.be/fx076EW_di0

कोल्हापूर, इचलकरंजी येथील डॉ. अमर कांबळे यांना यांना 'राजर्षी शाहू महराज सामाजिक न्याय पुरस्कार २०२३' ने सन्मानित करण्यात आले. डॉ. अमर कांबळे यांनी अत्यंत सामान्य परिस्थितीतून संघर्ष करत उच्च शिक्षण घेतले. अनेक पुस्तकांचे लेखन केले आहे. प्राध्यापक म्हणून कार्य करत आहेत. नालंदा प्रशासकीय सेवा अकादमीच्या माध्यमातून बहुजन समाजातील, आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा केद्र चालवतात. त्यांच्या सामाजिक कार्याची माहिती देणारा व्हिडीओ पुढील लिंक अथवा क्युआर कोड द्वारे पहावा.



लिंक - https://youtu.be/HlfZpNKu0lY

या परिषदेत जेष्ठ लेखक अंबादास सकट यांनी लिहिलेल्या 'अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील विचार दर्शन' या ग्रंथाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. पहिल्या उद्‌घाटन सत्राचे सूत्र संचालन विवेक विचार मंच चे राज्य संयोजक सागर शिंदे यांनी केले तर आभार प्रदर्शन विद्यापीठाचे कुलसचिव व्ही एन शिंदे यांनी केले.



दिवसभराच्या परिषदेत एकूण तीन सत्र झाली. दुसर्या सत्रामध्ये प्रामुख्याने वंचित घटकांचे समाजिक न्याय - हक्काचे प्रश्न, सामाजिक अन्याय अत्याचाराच्या व तणावाच्या घटना, विविध समस्या व त्यांचे निराकरण या अनुषंगाने चर्चा व संवाद झाला. अनेक सहभागी कार्यकर्त्यांनी या चर्चेत भाग घेतला. काहींनी समाजातील समस्या सांगितल्या, अनुभव सांगितले. ग्रामीण भागात अनुसूचित जातीतील व्यक्तींना अंत्यसंस्कार करण्यासाठी स्मशानभूमी नाही तसेच असलेल्या स्मशानभूमीमध्ये अंत्यसंस्कार करण्यास अटकाव केला जातो. विविध जातींच्या स्मशानभूमी असणे समाजच्या ऐक्यासाठी बाधक असल्याचे मत व्यक्त केले गेले. अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गात विविध आमिष दाखवून धर्मांतर केले जाते असे हि सांगितले. वंचित घटकांत लव्ह जिहाद सारख्या घटना वाढत असल्याचे अनेक उदाहरणे सहभागी कार्यकर्त्यांनी सांगितले. तसेच कामाच्या ठिकाणी अनुसूचित जाती वर अन्याय होत असल्याचे मत नोंदवले गेले. दीड तास विविध समस्यांवर चर्चा झाली. बारामतीचे विजय गव्हाळे, माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, जय भीम आर्मी चे नितीन मोरे, जनाधार संस्था लातूर चे श्री संजय कांबळे, जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते वाल्मिक निकाळजे यांनी या सत्राचे संचालन केले व त्यांचे अनुभव सांगितले.

सामाजिक न्याय परिषदेच्या तिसर्या समारोपाच्या सत्रात मंचावर गडचिरोली जन संघर्ष समितीचे श्री. दत्ताजी शिर्के, नागपूर येथील मंचाचे श्री. सुनीलजी किटकरू, श्रीमती कोमल साळुंखे व विवेक विचार मंच चे कार्यवाह श्री महेश पोहनेरकर हे उपस्थित होते. यावेळी सुरवातीला विवेक विचार मंच चे पूर्णवेळ कार्यकर्ते श्री.अरुण कराड (प.महा.प्रांत), श्री.ऋषिकेश सकनूर (मराठवाडा विभाग ), श्री. अशोक तिडके

(कोकण, मुंबई प्रदेश) व श्री अतुल शेंडे (विदर्भ प्रांत) यांचा परिचय तसेच कोकण प्रांत संयोजक श्री विजय वेदपाठक, विदर्भ प्रांत पालक श्री सुनील कीटकरू यांचा परिचय राज्य संयोजक श्री सागर शिंदे यांनी करून दिला. श्रीमती कोमल साळुंखे यांनी राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक कार्य या विषयी माहिती दिली. या सामाजिक न्याय परिषदेत दोन ठराव पारित करण्यात आले. अनुसूचित जाती-जमाती घटकांकरिता शासन स्तरावरून राबवण्यात येणाऱ्या आवास योजनांचा लाभ घेण्यासाठी गायरान/शासकीय क्षेत्रांवर घर बांधण्याकरिता जागा उपलब्ध करून देण्याबाबत पहिला ठराव करण्यात आला. तर ख्रिश्चन अथवा मुस्लिम धर्मात धर्मांतरित झालेल्यांना अनुसूचित जातींमध्ये समावेश असू नये आणि त्यांना आरक्षणाचा लाभ मिळू नये या संदर्भात दुसरा ठराव पारित करणायत आला. विवेक विचार मंच चे कार्यवाह महेश पोहनेरकर न्याय परिषदेचा समारोपात म्हणाले, जाती अंताची लढाई जिंकायची असेल, तर आपल्याला स्वजातीच्या टोकाच्या अस्मिता सोडून शासन, स्वयंसेवी संस्था आणि समाज या तिन्ही स्तरावर समन्वयाने चळवळ चालवावी लागेल."

अतिशय उत्साहात सामाजिक न्याय परिषद संपन्न झाली. या परिषदेच्या निमित्ताने जणू महाराष्ट्रातील सामाजिक कार्यकर्त्यांचा मेळाच जमला होता. ज्या भूमी मध्ये राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक न्यायचे, समतेचे यशस्वी प्रयोग केले. त्या कोल्हापूर शहरात आणि शिवाजी विद्यापीठाच्या प्रसन्न वातावरणात हि सामाजिक न्याय परिषद संपन्न झाली.

## सामाजिक न्याय परिषदेची प्रसारमाध्यमांनी घेतलेली दखल –



पुढारी

### कोल्हापुरात रविवारी राज्यस्तरीय सामाजिक न्याय परिषद

**राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त आयोजन : केंद्रीय मंत्री भारती पवार, कामगारमंत्री सुरेश खाडे यांची प्रमुख उपस्थिती**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विवेक विचार मंच, महाराष्ट्र, सहयोगी संस्था व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी शाहू महाराज जयंती व सामाजिक न्याय दिनाचे औचित्य साधत एकदिवसीय राज्यस्तरीय सामाजिक न्याय परिषदेचे रविवार (दि. २५ जून) रोजी सकाळी १० वाजता विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात आयोजन केले आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठ राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे, विवेक मंचचे राज्य संयोजक सागर शिंदे यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दिली.

सामाजिक न्याय परिषदेचे उद्घाटन केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री भारती पवार, कामगारमंत्री सुरेश खाडे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे (बार्टी) महासंचालक सुनील वारे, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणेचे प्रदीप रावत, भाजपचे जिल्हाध्यक्ष (ग्रामीण) समरजितसिंह घाटगे, कुलगुरू डॉ. डी.टी.शिर्के, प्र-कुलगुरू डॉ.पी.एस.पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

यावेळी दौलतराव खरात (बुलढाणा), योगेश शिंदे (नाशिक), वाल्मिक निकाळजे (बीड), प्रा.डॉ. अमर कांबळे (इचलकरंजी) यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज सामाजिक न्याय पुरस्काराने गौरवले जाणार आहे. राज्यभरातून २०० संस्था, संघटनांचे ३५० प्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्ते सहभागी होणार आहे. परिषदेत वंचित घटकांचे सामाजिक न्याय-हक्काचे प्रश्न, सामाजिक अन्याय, अत्याचाराच्या व तणावाच्या घटना, विविध समस्या व त्यांचे निराकरण या अनुषंगाने मान्यवरांचे मार्गदर्शन, चर्चा, संवाद होईल. तसेच दोन ठराव केले जाणार आहेत. यावेळी मंचचे जिल्हा संयोजक अमित कांबळे, स्वागत समिती सदस्य रतन कांबळे उपस्थित होते.

Kolhapur Edition
Jun 23, 2023 Page No. 5
newspaper.pudhari.co.in



सकाळ

### विद्यापीठात रविवारी राज्यस्तरीय सामाजिक न्याय परिषद : शिंदे

कोल्हापूर, ता. २२ : विवेक विचार मंच व शिवाजी विद्यापीठातर्फे २५ जूनला राजर्षी शाहू जयंती व सामाजिक न्याय दिनाचे औचित्य साधून 'राज्यस्तरीय सामाजिक न्याय परिषद-२०२३' होत आहे. दौलतराव खरात, योगेश शिंदे, वाल्मिक निकाळजे, प्रा. डॉ. अमर कांबळे यांना परिषदेत राजर्षी छत्रपती शाहू महाराज सामाजिक न्याय पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात सकाळी दहा वाजता परिषदेस सुरवात होईल, अशी माहिती मंचचे निमंत्रक सिद्धार्थ शिंदे यांनी आज येथे पत्रकार परिषदेत दिली.

शिंदे म्हणाले, "एकूण तीन सत्रात परिषद होणार असून, वंचित घटकांचे सामाजिक न्याय-हक्काचे प्रश्न, सामाजिक अन्याय अत्याचाराच्या व तणावाच्या घटना, विविध समस्या व त्यांचे निराकरण यावर मार्गदर्शन व चर्चा होईल. परिषदेत दोन ठराव करण्यात येणार आहेत."

ते म्हणाले, "कामगार मंत्री सुरेश खाडे व आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री भारती पवार यांच्या हस्ते परिषदेचे उद्‌घाटन होणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे (बार्टी) महासंचालक सुनील वारे, मंचचे अध्यक्ष प्रदीप रावत प्रमुख उपस्थित असतील.' सागर शिंदे, अमित कांबळे उपस्थित होते.

कोल्हापूर, शुक्रवार, २३ जून २०२३



### विवेक विचार मंचच्यावतीने २५ रोजी राज्यस्तरीय सामाजिक न्याय परिषद

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती व सामाजिक न्याय दिनाच्या निमित्ताने विवेक विचार मंचच्या वतीने २५ जून रोजी शिवाजी विद्यापीठात राज्यस्तरीय सामाजिक न्याय परिषद आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेत सामाजिक क्षेत्रातील चार जणांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज सामाजिक न्याय पुरस्कार देण्यात येणार आहे, अशी माहिती मंचचे जिल्हा संयोजक अमित कांबळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

विवेक विचार मंच ही संस्था महाराष्ट्रात सामाजिक विषयात कार्यरत आहे. यावर्षी विवेक विचार मंच, महाराष्ट्र, सहयोगी संस्था आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंतीनिमित्त व सामाजिक न्याय दिनाच्या औचित्याने एकदिवसीय राज्यस्तरीय सामाजिक न्याय परिषद २०२३ चे आयोजन २५ जून रोजी विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात करण्यात आले आहे. महाराष्ट्राचे कामगार मंत्री सुरेश खाडे आणि केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री भारती पवार परिषदेचे उद्घाटक आहेत. बार्टीचे महासंचालक सुनिल वारे, विवेक विचार मंचचे अध्यक्ष प्रदीप रावत, भाजपाचे जिल्हाध्यक्ष समरजितसिंह घाटगे, कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील यांची उपस्थिती असणार आहे. परिषदेत एकूण तीन सत्रे होणार आहेत.

यावेळी बुलडाण्याचे दौलतराव खरात, नाशिकचे योगेश शिंदे, बीडचे वाल्मिक निकाळजे, इचलकरंजीचे डॉ. अमर कांबळे यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज सामाजिक न्याय पुरस्कार देण्यात येणार आहे. पत्रकार परिषदेला शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य सिध्दार्थ शिंदे उपस्थित होते.

पुढारी

# शाहू-फुले-आंबेडकर यांचे सामाजिक न्यायाचे विचार अंगीकारण्याची गरज

## केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भारती पवार; शिवाजी विद्यापीठात राज्यस्तरीय सामाजिक न्याय परिषद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

'वसुधैव कुटुंबकम' या तत्त्वाप्रमाणे भारताने अनेक देशांना सहकार्य करत विकास जगाला दाखवून दिला आहे. अमृतमहोत्सवी वर्षात पुढील २५ वर्षे महत्त्वाची आहेत. शतक महोत्सवाचा आराखडा पुढे जाण्यासाठी प्रत्येकाने त्या जाणिवेतून काम करावे. देशाच्या प्रगतीसाठी प्रत्येकाने शाहू-फुले-आंबेडकर यांचे सामाजिक न्यायाचे विचार अंगीकारायला हवेत, असे प्रतिपादन केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांनी केले.

विवेक विचार मंच, सहयोगी संस्था व शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती व सामाजिक न्याय दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात आयोजित राज्यस्तरीय सामाजिक न्याय परिषदेत त्या बोलत होत्या. परिषदेचे उद्घाटन मंत्री डॉ. पवार, कामगारमंत्री सुरेश खाडे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी सामाजिक न्यायासाठी महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या दौलतराव खरात (बुलढाणा), वाल्मिक निकाळजे (बीड), योगेश शिंदे (नाशिक), प्रा. डॉ. अमर कांबळे (इचलकरंजी) यांना राजर्षी शाहू महाराज सामाजिक न्याय पुरस्काराने गौरविण्यात आले.

मंत्री डॉ. पवार म्हणाल्या, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने भारताने कोरोना काळात इतर देशांना औषधे, लसींचा पुरवठा व अन्य संकटकालीन मदत केली आहे. सामाजिक न्यायाने देशाला पुढे नेण्याचे संविधाने शिकवले आहे. संविधानाचा सन्मान करणे, प्रत्येकाचे कर्तव्य असून देशाचा विकास साधताना स्त्री शक्तीचा सन्मान होणे महत्त्वाचे आहे.

कामगारमंत्री सुरेश खाडे म्हणाले, बहुजन समाजाच्या उन्नतीमध्ये महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. महापुरुषांनी दिलेला सामाजिक न्यायाचा विचार व त्यांच्या कार्याचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून प्रत्येकाने वाटचाल करायला हवी.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्हिडीओच्या माध्यमातून शुभेच्छा संदेश दिला. ते म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक समतेचा संदेश देत समाजाला योग्य दिशा व सामाजिक भान दिले. सामाजिक समतेचा संदेश व त्यासाठी कार्य करून लोकशाहीची मुहूर्तमेढ छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापुरात रोवली. याच विचारांनी लोकशाही मार्गाने वाटचाल करत भारत देशाने सर्व क्षेत्रात प्रगती साधली आहे.

'बार्टी'चे महासंचालक सुनील वारे म्हणाले, अनुसूचित जाती-जमातीतील प्रत्येकाला प्रशिक्षण देऊन हाताला काम मिळवून देण्याचे काम 'बार्टी'च्या माध्यमातून करण्यात येत असून याचा लाभ घ्यावा.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, जाती-धर्मांतील भेद नष्ट करून समाजात समता प्रस्थापित करण्यासाठी फुले, शाहू, आंबेडकर यांच्यासारख्या महापुरुषांचे विचार जोपासणे गरजेचे आहे. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने शाहू महाराजांचे जीवनचरित्र दोन परकीय भाषांबरोबरच विविध राज्यांच्या भाषेमध्येही भाषांतर करून शाहू महाराजांचे कार्य देश-विदेशात पोहोचवण्याचे प्रयत्न केले.

विवेक मंचचे अध्यक्ष प्रदीप रावत यांनी प्रास्ताविक केले. सागर शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. अरुण कराड यांनी संविधान सरनामा वाचन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित राज्यस्तरीय सामाजिक न्याय परिषदेत बोलताना केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार. व्यासपीठावर कामगारमंत्री सुरेश खाडे, प्रदीप रावत, सुनील वारे, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे आदी. (छाया : पप्पू अत्तार)

### काँग्रेसकडून जागतिक पटलावर भारताची बदनामी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाची जागतिक पटलावर वेगळी ओळख निर्माण झाली आहे. परंतु, सभागृहात न येता, बोलू दिले जात नाही, असा आरोप करणारे काँग्रेसचे नेते राहुल गांधी अमेरिकेत जाऊन भारताची लोकशाही धोक्यात असल्याचे सांगत आहेत. हे संविधान कोणासाठी आहे, हेच कळत नाही. भारताबद्दल चुकीचे, निंदनीय राजकारण करून संविधानाचा अपमान करण्याचा त्यांना नैतिक अधिकार नाही, असा टोला केंद्रीय राज्यमंत्री पवार यांनी लगावला.

Kolhapur Edition
Jun 26, 2023 Page No. 9
newspaper.pudhari.co.in

## इलेक्ट्रॉनिक मिडिया व वेब पोर्टल्स ने घेतलेली दखल..

- देशाच्या प्रगतीसाठी सामाजिक न्यायाचे विचार अंगिकारा- केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भारती पवार- https://www.loksatta.com/kolhapur/adopt-the-idea-of-social-justice-for-progress-of-country-says-union-minister-of-state-dr-bharti-pawar-mrj-95-3746641/lite/?utm_source=Whatsapp
- कोल्हापुरात परिषद : देशाच्या प्रगतीसाठी सामाजिक न्यायाद्वारे आत्मनिर्भर होण्याचा निर्धार!! https://thefocusindia.com/maharashtra/determined-to-be-self-reliant-through-social-justice-for-the-progress-of-the-country-196404/amp/
- शिवाजी विद्यापीठात सामाजिक न्याय परिषद संपन्न .. युट्युब - https://youtu.be/S2ohR8h4THU
- सामाजिक न्यायाचा जागर – लेख – सागर शिंदे , साप्ताहिक विवेक - https://drive.google.com/file/d/1bHsZvjkB5Qtza5bD7BaNAu69mrd6HbJd/view?usp=drivesdk